# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ३८७/२०२३ दिनांक – ०३/११/२०२३

## विविध गृह निर्माण कंपन्यांची स्थापना करुन त्याव्दारे सुमारे १५० गुंतवणूकदारांची ३० कोटी रुपयांची आर्थिक फसवणुक करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात कक्ष - ३, गुन्हे शाखेला यश

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील आर्थिक गुन्हे शाखेकडे तपासावर असलेल्या गुन्हयातील पाहिजे / फरारी आरोपींचा शोध घेऊन अटक करण्याबाबत मा. वरिष्ठांकडुन सुचना देण्यात आल्या होत्या.

सन २०११ ते दिनांक ०४/०५/२०१८ रोजी दरम्यान मे. मंदार हौसिंग प्रायव्हेट लिमीटेड, या बांधकाम कंपनीचे संचालक/भागीदार/प्रवर्तक/मध्यस्थ राजु सुलीरे, अविनाश ढोले, विपुल बी पाटील, अल्लाऊद्दीन शेख, युसुफ कोटवाला आणी इतर यांनी आपसात संगणमत करुन तसेच फौजदारीपात्र कट रचुन प्रथम गरजू गुंतवणुकदार/ग्राहकांना आधुनिक सोयीसुविधांनी युक्त अशी घरे सवलतीच्या दरात देण्याचे खोटे अमिष दाखवले. त्यानंतर गुंतवणुकदार/ग्राहकांना त्यांनी आर्थिक गुंतवणूक केलेल्या आश्वाषित सदनिकांचा ताबा विहीत वेळेत देत असल्याचे सांगुन न दिल्यास व्याजासह गुंतवणुकीची/ मुद्दलाची रक्कम परत करण्याची हमी दिली.

त्यानंतर आरोपी यांनी गुंतवणुकदार/ग्राहकांच्या ठेवी स्विकारुन त्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी सदनिकांच्या नोंदणीकृत सेल्स ॲग्रीमेंट करुन बनावट व खोटया दस्तऐवजाच्या आधारे एकच सदनिका अनेक ग्राहकांना विक्री करुन फसवणुक केली. त्याबाबत अर्नाळा सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर १३५/२०१८, भारतीय दंड संहिता १८६० चा अधिनियम कलम ४०६, ४०९, ४६५, ४६७, ४७१, ४२०, ३४, १२० (ब) सह महाराष्ट्र ठेवीदारांचे हितरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३, ४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये आरोपीत राजु सिध्दय्या सुलीरे याचा शोध घेणे करीता गुन्हे शाखा कक्ष -३ चे वेगवेगळे पथक तयार करुन आरोपीत यांचा तांत्रीक विश्लेषण व गुप्तबातमीदारा मार्फत माहिती मिळवुन आरोपीत नामे - राजु सिध्दय्या सुलीरे वय - ५४ वर्षे, रा. मरिअप्पानापाडीया नगर, केंगेरी, बंगलुरु, कर्नाटक यास बंगलुरु येथुन ताब्यात घेण्यात आले असुन आरोपीत राजु सिध्दय्या सुलीरे याचे कडे प्राथमिक तपास करता त्यांने विविध गृह निर्माण कंपन्यांची स्थापना करुन त्याव्दारे सुमारे १५० गुंतवणूकदारांची ३० कोटी रुपयांची आर्थिक फसवणुक केल्याने निष्पन्न झाले असुन आरोपीत यास पुढील कारवाई करीता आर्थिक गुन्हे शाखा यांचे ताब्यात देण्यात आले आहे. नमुद आरोपीत यास दिनांक ०९/११/२०२३ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त सो., (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पो.उप.निरी.अभिजित टेलर, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब. गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष -३ तसेच सफौ/ संतोष चव्हाण नेम- सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.